# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती सुधारित नियमावली

**योजनेचा उद्देश :—**

शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध संलग्न महाविद्यालयात, मान्यताप्राप्त संस्थेत तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणा—या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यांच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने **"शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती"** निर्माण केली आहे.

**प्रस्तावना :—**

शिवाजी विद्यापीठाचे सध्याचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्हयात विस्तारलेले आहे. या विद्यापीठांतर्गत असणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात विखुरलेली आहेत. अपु—या सोई सुविधा असतानाही विद्यापीठातंर्गत शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठया चिकाटीने व जिद्दीने उच्च शिक्षण घेतात. शिवाजी विद्यापीठातंर्गत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी देशात तसेच देशाबाहेर उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे हे विद्यापीठ नावारुपाला आले आहे. विद्यापीठाचा नावलैकिक असाच वाढत रहावा म्हणून या विद्यापीठातंर्गत विविध सलंग्न महाविद्यालयात, मान्यताप्राप्त संस्थात तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागात उच्च शिक्षण घेणा—या गुणवत्ताधारक विद्यार्थी/विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना शैक्षणिक प्रोत्साहान देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने सन १९९८—१९९९ पासून **"शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती"** ची निर्मिती केली आहे. यासाठी विद्यापीठाने गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांबरोबरच आर्थिकदृष्टया दुर्बल, निराधार, अंध, अपंग व कर्णबधीर, मुखबधीर, गुणवंत खेळाडू यांना शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले आहे. यामुळे त्यांच्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहान मिळेल व शिष्यवृत्तीच्या रुपाने त्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळेल हा उद्देश आहे.

**सदर शिष्यवृत्तीचे नियम खालील प्रमाणे आहेत.**

**१) नांव :— या शिष्यवृत्तीचे नांव "शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती" असे राहील.**

**२) व्याप्ती :—**

सदरची शिष्यवृत्ती शिवाजी विद्यापीठाच्या सर्व अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील सर्व विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींना देण्यात येईल. सदरची शिष्यवृत्ती संशोधन पदवी तसेच सर्व प्रकारच्या पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना तसेच बहिस्थ: विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना देय असणार नाही.

**३)शिष्यवृत्तीचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत:**

अ) सर्वसाधारण शिष्यवृत्ती — (फक्त गुणवत्तेच्या आधारे)
ब) आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती — (गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे)
क) निराधार शिष्यवृत्ती — (गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थितीतीच्या आधारे)
ड) अंध, अपंग व कर्णबधीर, मुखबधीर शिष्यवृत्ती (गुणवत्ता व शारिरिक दिव्यांगाच्या आधारे)
Percentage of Disablility (Handicapped)
इ) गुणवंत खेळाडू शिष्यवृत्ती — (गुणवत्ता व खेळातील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे)

४) पात्रतेचे निकष:

१. सदरची शिष्यवृत्ती देताना संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या मार्च/एप्रिल मधील वार्षिक परीक्षेतील गुणांचा विचार केला जाईल. ज्या ठिकाणी सत्र (सेमिस्टर) पध्दती आहे त्या ठिकाणी प्रथम सत्रातील परीक्षेचे गुण व व्दितीय सत्रातील परीक्षेचे गुण एकत्रित करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

२. शिष्यवृत्तीसाठी मागील शैक्षणिक वर्षात मार्च/एप्रिल परीक्षेत किमान ६०%(साठ टक्के) गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३. श्रेणी अथवा उत्तीर्ण होण्यासाठी गुणात वाढ करताना विद्यापीठ नियमाप्रमाणे वापरलेल्या दंडकाचा लाभ गुणवत्तेसाठी विचारात घेतला जाणार नाही.

४. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींने त्याला/तिला ज्या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली तो अभ्यासक्रम त्याने/तिने शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/विद्यापीठ अधिविभागात पूर्ण करणे आवश्यक आहे.

५. अभिमत विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालये/स्वायत्त मान्यताप्राप्त संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती देय असणार नाही.

६. पदवी अभ्यासक्रमाच्या भाग १ ला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने महाराष्ट्रातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेली परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

७. पदवी अभ्यासक्रमाच्या भाग.२ व त्यापुढील तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या भाग १ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आधीची परीक्षा शिवाजी विद्यापीठामार्फतच उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

८. संबंधित पात्र विद्यार्थ्याला विद्यापीठाची/राज्य शासनाची/केंद्र शासन (ईबीसी/एसटीसी/पीटीसी वगळून) यापैकी कोणतीही एकच शिष्यवृत्ती स्विकारता येईल.

९. या शिष्यवृत्तीसाठी नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनीच पात्र असेल.

१०. सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीनी अर्जासह आधारकार्ड आणि १८ वर्षावरील विद्यार्थी/विद्यार्थीनीनी आधारकार्ड व मतदान ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. तसेच ज्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते आहे त्या बँकेचे पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

५ ) **शिष्यवृत्तीची अनुज्ञेय रक्कम व शिष्यवृत्तींची संख्या खालील प्रमाणे राहील.**

- **पदवी पातळीसाठी दरमहा रु.५००/–**
- **पदव्युत्तर पातळीसाठी दरमहा रु.१०००/**

- सदरची शिष्यवृत्ती १० महिने कालावधीसाठी देय राहिल.
- सर्वसाधारण गटातील शिष्यवृत्तींची संख्या मागील वर्षी मार्च/एप्रिल मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या ज्या — त्या अभ्यासक्रमाच्या/विषयाच्या परीक्षेस बसलेल्या एकूण नियमित व फ्रेश विद्यार्थी संख्येवर अवलंबून राहील व इतर गटातील शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखा निहाय ०८ राहिल.
- शिष्यवृत्तींची संख्या विहित झाल्यानंतर पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीपैकी गुणवत्तेनुसार शेवटी असणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीचे गुण समान असतील तर समान गुणांच्या विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या शिष्यवृत्तीची तितकीच रक्कम त्या पुढील संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनीस देय राहिल.
- उपरोक्त अ.क्र. ०३ येथील अ,ब,क,ड,इ, येथे नमूद केलेल्या शिष्यवृत्ती प्रकारांना उपरोक्त नियम लागू असतील व प्रत्येक शिष्यवत्तींच्या प्रकारासाठी खालीलप्रमाणे पोटनियम राहतील.

६) अ) <u>सर्वसाधारण शिष्यवृत्तीचे पोटनियम</u>

- सदरची शिष्यवृत्ती फक्त गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.
- शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी प्रवेश घेवून त्यावर्षी त्या वर्गाच्या परीक्षेस बसलेल्या एकूण नियमित व फ्रेश विद्यार्थी संख्येवर शिष्यवृत्तीची संख्या अवलंबून राहील. सदरची शिष्यवृत्ती ही वर्गनिहाय व विषय निहाय असेल.
- पदवी पातळीवरील भाग १ च्या शिष्यवृत्तीसाठी मागील वर्षाच्या मार्च/एप्रिल मधील महाराष्ट्रातील सर्व एच.एस.सी. बोर्डच्या परीक्षेचे एकूण गुण विचारात घेतले जातील. जे विषय/ ज्या विद्याशाखा एच.एस.सी. पातळीवर शिकविल्या जात नाहीत परंतू त्या पदवी पातळीवर शिकविल्या जातात अशा विषयांना/ विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देताना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या एच.एस.सी. अभ्यासक्रमाच्या एकूण गुणांचा विचार केला जाईल. उदा. एल.एल.बी. पाच वर्षाचा अभ्यासक्रम, बी.ए.बी.एड, अभियांत्रिकी अभ्यासक्रम इ.
- पदवी पातळीवरील प्रथम वर्गाला ६०० विद्यार्थ्यांच्या मागे एक शिष्यवृत्ती दिली जाईल व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु.५००/–. अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ६०० पेक्षा कमी असेल अशा ठिकाणी एक विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/– अशी राहील.
- पदवी पातळीवरील व्दितीय वर्गाला ५०० विद्यार्थ्यांमागे ०१ शिष्यवृत्ती दिली जाईल व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/– अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा कमी असेल अशा ठिकाणी एक विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/–. अशी राहील.
- पदवीच्या तृतीय वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना विद्यार्थ्याने व्दितीय वर्षाच्या वैकल्पिक विषयामधून तृतीय वर्षासाठी जो विषय निवडला असेल त्या वैकल्पिक विषयाचे व्दितीय वर्षाचे गुण विचारात घेतले जातील व ४०० विद्यार्थ्यांमागे ०१ शिष्यवृत्ती दिली जाईल व शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु.५००/– अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ४०० पेक्षा कमी असेल अशा ठिकाणी एक विद्यार्थी पात्र होईल व सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रु. ५००/– अशी राहील.
- अभियांत्रिकीसाठी ब्रॅचवाईज व शिक्षणशास्त्र साठी मेथड वाईज शिष्यवृत्ती दिली जाईल. सदर शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रू. ५००/–. अशी राहील.
- वरील नियम पदवी पातळीवरील अभ्यासक्रमाच्या चौथ्या व पाचव्या वर्षासही लागू राहतील व ज्या ठिकाणी वैकल्पिक विषय निवडले जात नाहीत त्या ठिकाणी एकूण गुणांचा विचार केला जाईल.
- पदव्युत्तर पातळीवरील प्रथम वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना (आवश्यक इंग्रजी विषय सोडून) पदवी पातळीवरील विषयाचे गुण विचारात घेतले जातील व दुस–या वर्षासाठी शिष्यवृत्ती देताना पदव्युत्तर पातळीवरील प्रथम वर्षाचे एकूण गुण विचारात घेतले जातील. जे विषय पदवी पातळीवर शिकवले जात नाहीत परंतु ते पदव्युत्तर पातळीवर शिकविले जातात अशा विषयांना/अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती देताना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाचे एकूण मिळालेल्या गुणांच्या बेरजेचा विचार एकत्रित (आवश्यक इंग्रजी विषय सोडून) केला जाईल.
- पदव्युत्तर पातळीवरील वर्गाला/विषयाला ४०० विद्यार्थ्यांच्या मागे एक शिष्यवृत्ती दिली जाईल. शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रू. १०००/–अशी राहील. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या ४०० पेक्षा कमी असेल त्याविषयाला एक शिष्यवृत्ती दिली जाईल.

(वरील नियम पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तिस–या वर्षासही लागू राहतील.)

ब) <u>आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीचे पोट नियम–</u>

- सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे देण्यात येईल.
- सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व देण्यांत येईल.
- उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबीसांठी देण्यांत येतील.

**अ) कौटुंबिक उत्पन्न – २० गुण**

**(यासाठी तहसिलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यांत येईल.)**

- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.४०,०००/– ते रू. ७०,०००/– पर्यंत असल्यास २० गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. ७०,०००/–ते रू. १,००,००१/– पर्यंत असल्यास १६ गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. १,००,००१/–ते रू. १,३०,००१/– पर्यंत असल्यास १३ गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.१,३०,००१/– ते रू. १,६०,००१/–. पर्यंत असल्यास १० गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.१,६०,००१/–ते रू.२,५०,०००/–.पर्यंत असल्यास ०७ गुण
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/– पेक्षा जास्त असल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**ब) विद्यार्थी हा ग्रामीण, दुर्गम, अती दुर्गम भागात राहत असल्यास –१० गुण**

(यासाठी प्राचार्यांचा दिलेला दाखला विचारात घेतला जाईल.)

- अती दुर्गम भागात रहात असल्यास – १० गुण {आधारकार्ड व शासन निर्णय जोडणे आवश्यक आहे.}
- दुर्गम भागात रहात असल्यास – ०७ गुण {आधारकार्ड व शासन निर्णय जोडणे आवश्यक आहे.}
- ग्रामीण भागात रहात असल्यास – ०५ गुण {आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे.}

४) सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय ०८ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करून प्रथम असलेल्या ०८ विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रू. १०००/–प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रू १५००/– प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

क) निराधार शिष्यवृत्तीचे पोट नियम :–

१. सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थितीच्या निकषांच्या आधारे देण्यात येईल.
२. सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व देण्यात येईल.
३. उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबीसांठी देण्यात येतील.

- आई व वडील हयात नसतील तर १५ गुण, आई व वडील दोघांपैकी एकजण हयात असेल तर १० गुण. विद्यार्थी निराधार संस्थेत राहणारा असेल तर १५ गुण.

  (यासाठी महानगरपालिका/नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेला मृत्युचा दाखला (साक्षांकीत प्रत) जोडणे आवश्यक आहे.)

- विद्यार्थी/विद्यार्थीनी सर्व पाल्यांमध्ये जेष्ठ असेल व कुटुंबाचे चरितार्थ त्याच्यावर/तिच्यावर चालत असल्यास १० गुण.

  (यासाठी रेशनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.)

- विद्यार्थी/विद्यार्थीनी नाईट कॉलेज मध्ये शिकत असल्यास ०५ गुण.

  (यासाठी प्राचार्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.)

- सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय ०८ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्याची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करून प्रथम असलेल्या ०८

विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रू.१०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रू.१५००/—. प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

**ड) अंध,अपंग कर्णबधीर व मुखबधीर शिष्यवृत्तीचे पोट नियम**

सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व शारिरीक दिव्यांगाच्या निकषांच्या आधारे देण्यात येईल.

१. सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व देण्यांत येईल.

२. उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबीसाठी देण्यांत येतील.

- विद्यार्थी/विद्यार्थीनी ४० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास ०७ गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी ५० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास १० गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी ६० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास १३ गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी ७० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास १६ गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी ८० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास २० गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी ९० टक्के अंध, अपंग, व कर्णबधीर, मुखबधीर असल्यास २५ गुण
- विद्यार्थी/विद्यार्थीनी १०० टक्के अंध, अपंग, कर्णबधीर, व मुखबधीर असल्यास ३० गुण

**यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

३. सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय ०८ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्याची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करून प्रथम असलेल्या ०८ विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रू. १,०००/— प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रू. १,५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

**इ) गुणवंत खेळाडू शिष्यवृत्तीचे पोट नियम —**

१. सदरची शिष्यवृत्ती गुणवत्ता व खेळातील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे देण्यात येईल.

२. सदर शिष्यवृत्तीसाठी निवड करताना विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेला ७० टक्के महत्व देण्यात येईल.

३. उर्वरित ३० टक्के गुण खालील बाबींसाठी देण्यात येतील.

| अ. क्र. | | **सांघिक कामगिरी** | | | **वैयक्तिक कामगिरी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम क्रमांक | व्दितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | प्रथम क्रमांक | व्दितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
| १. | विद्यापीठ पातळी | ४ गुण | ३ गुण | २ गुण | ४ गुण | ३ गुण | २ गुण |
| २. | राज्य पातळी /अश्वमेध | ५ गुण | ४ गुण | ३ गुण | ५ गुण | ४ गुण | ३ गुण |
| ३. | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ विभागीय स्पर्धा | ६ गुण | ५ गुण | ४ गुण | ६ गुण | ५ गुण | ४ गुण |
| ४. | राष्ट्रीय पातळी | ७ गुण | ६ गुण | ५ गुण | ७ गुण | ६ गुण | ५ गुण |
| ५. | आंतरराष्ट्रीय पातळी | ८ गुण | ७ गुण | ६ गुण | ८ गुण | ७ गुण | ६ गुण |
| | एकूण | **३० गुण** | **२५ गुण** | **२० गुण** | **३० गुण** | **२५ गुण** | **२० गुण** |

(टिप : जो खेळाडू वरील स्पर्धामध्ये सहभागी झालेला आहे. अंशा विद्यार्थ्यास सहभागाबद्दल ०१ गुण दिला जाईल)

यासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे साक्षांकित करून जोडणे आवश्यक राहील. तसेच शिष्यवृत्ती देताना संबंधित विद्यार्थ्याच्या फक्त मागील वर्षातील कामगिरीचा विचार केला जाईल तसेच संबंधित विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीसाठी पात्र होण्यासाठी वरील ३० गुणांपैकी किमान ०३ गुण मिळविणे आवश्यक आहे.

सदर शिष्यवृत्तींची संख्या विद्याशाखानिहाय ०८ राहील. नामांकन अर्ज केलेल्या पदवी व पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांची वरील निकषांच्या आधारे एकच गुणवत्ता यादी तयार करून प्रथम असलेल्या ०८ विद्यार्थ्यांना पदवी पातळीवर प्रत्येकी दरमहा रू.१०००/—प्रमाणे व पदव्युत्तर पातळीवर प्रत्येकी दरमहा रू. १५००/— प्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

**अ) आर्थिक दुर्बल घटक ब) अंध,अपंग कर्णबधीर व मुखबधीर घटक क) निराधार घटक ड) गुणवंत खेळाडू घटक**

उपरोक्त घटकांमधील एखाद्या घटकासाठी एकूण अर्ज मर्यादेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असतील व अन्य घटकामध्ये विद्याशाखा निहाय दयावयाच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज कमी प्राप्त झाले असतील तर ज्या गटात मर्यादेपेक्षा जास्त अर्जाकरीता अन्य गटातील मर्यादेपेक्षा रिक्त राहीलेली विद्यार्थी संख्या घेण्यात यावी.

७.) **<u>निवड व छाननी समितीचे गठण—</u>**

सदर शिष्यवृत्तीसाठी योग्य विद्यार्थी/विद्यार्थीनींची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| मा. कुलगुरू | अध्यक्ष |
| मा. प्र. कुलगुरू | सदस्य |
| एक अधिष्ठाता | सदस्य (मा. कुलगुरू नियुक्त) |
| एक व्यवस्थापन परिषद सदस्य | (व्यवस्थापन परिषद नियुक्त) |
| एक विद्यापरिषद सदस्य | (विद्यापरिषद नियुक्त) |
| एक अधी सभा सदस्य | (अधी सभेव्दारा नियुक्त) |
| एक विभाग प्रमुख | सदस्य (मा. कुलगुरू नियुक्त) |
| एक संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य | सदस्य (मा. कुलगुरू नियुक्त) |
| नियमावली समितीमधील एक सदस्य | सदस्य (मा. कुलगुरू नियुक्त) |
| मा. कुलसचिव | सदस्य |
| मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळे | सदस्य |
| मा. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| मा. परीक्षा नियंत्रक | सदस्य |
| उपकुलसचिव, पीजी प्रवेश विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य सचिव |

८.) सदर शिष्यवृत्तीसांठी आलेल्या नामांकन अर्जाची छाननी करण्यासांठी खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| मा. कुलगुरु निर्देशित केलेले प्राध्यापक | अध्यक्ष |
| मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| एक प्राध्यापक, कला विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| एक प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त |
| एक प्राध्यापक, सायन्स विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| एक प्राध्यापक, इंजिनिअरींग विद्याशाखा (तंत्रज्ञान अधिविभाग) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य (मा. कुलगुरु नियुक्त) |
| एक क्रीडा अधिविभाग प्रमुख, क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| एक वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| रेक्टर, कमवा व शिका योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| सहा.कुलसचिव, पीजी प्रवेश विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - | सदस्य सचिव |

शिष्यवृत्तीचे विहीत नमुन्यातील अर्ज विद्यापीठामार्फत विद्यापीठाच्या सांकेतिक स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील महाविद्यालयांनी/अधिविभागांनी मान्यता पात्र शिक्षणसंस्थेतील विद्यार्थी/ विद्यार्थिनीचे नामाकंन अर्ज योग्य त्या कागदपत्राच्या पूर्ततेसह विहीत केलेल्या मुदतीत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्वसाधारण गटामध्ये द्यावयाच्या

शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींची नांवे विद्यापीठामार्फत कळविण्यांत येतील. ज्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी अन्यत्र प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्याची महिति तसेच राष्ट्रीयकृत बॅक खात्यांची माहिती, आधारकार्ड व १८ वर्षावरील विद्यार्थ्याचे मतदार ओळखपत्राची छायांकीत प्रत न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणर नाही. याबाबतची माहिती महाविद्यालयांनी व अधिविभागांनी विद्यापीठास वेळीच कळविणे आवश्यक आहे. वेळेत न आलेल्या व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**९ <u>गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील –</u>**

सदर शिष्यवृत्तीचे अर्ज दरवर्षी दि. ३० सप्टेंबर पूर्वी विद्यापीठ संकेतस्थळावर ऑनलाइन भरून त्याची हार्डकॉपी मा. प्राचार्य/ अधिविभागप्रमुख यांच्या सहीने महाविद्यालयामार्फत/अधिविभागांमार्फत या कार्यालयास सादर करावेत. त्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरले जाणार नाहीत. गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्याची यादी ३१ जानेवारीपर्यंत जाहीर करणेत येईल. सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग यांनी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याची **<u>गैरहजेरी/ वर्तणूक</u>**/प्रवेश रदद इत्यादी बाबतचे बदल ३१ डिसेंबरपर्यत विद्यापीठ कार्यालयास कळवावेत. गुणवत्ता शिष्यवृत्तीबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठाचा राहील.

१. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यापैकी एखादा विद्यार्थी अपात्र ठरल्यास त्याच्या पुढील विद्यार्थ्यास गुणानुक्रमे प्राधान्य देण्यात यावे यासाठी प्रत्येक शिष्यवृत्तीसाठी दहा टक्के अधिकची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.
२. शिष्यवृत्ती योजनेच्या नियमांमध्ये बदल/सुधारणा करण्याचा, तसेच एखादया शिष्यवृत्ती धारकाबाबत वर्गातील अनुपस्थिती, वर्तणूक इत्यादी संदर्भात प्रतिकूल अहवाल असल्यास अथवा आढळल्यास सदरची शिष्यवृत्ती काढून घेण्याचा अधिकार विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहील.

- विद्याशाखा निहाय सर्वाधिक गुणवत्ता मिळणा–या पहिल्या शहरी, निमशहरी व ग्रामीण, महाविद्यालयांच्या प्राचार्याचा सत्कार प्रतिवर्षी विद्यापीठ कार्यालयात प्रशासनाने निश्चित केलेल्या दिनांकास घेण्यात येईल.
    - **शहरी** (महानगरपालिका)
    - **निमशहरी** (नगर पालिका / नगरपरिषद)
    - **ग्रामीण** (ग्रामपंचायत)

* * * *